# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- १३/०३/२०१८

दिनांक १३/०३/२०१८ रोजी अवैध दारु विक्रि संबंधात गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली प्रदिप चौगावकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पथकातील दादाजी करकाडे, पितांबर गेडाम, बालाजी फावडे, अंकुश धांडे, वैशाली चव्हाण अशा प्रकारचा पोलीस पथक मौजा गडचिरोली येथे पोहचुन तेथील स-हाईत अवैध दारु विक्रेता १) शहबाज जब्बार शेख, २) सचिन कोल्लुलवार, ३) सुनिल गोवर्धन पंजवानी तिघेही रा. गडचिरोली ता.जि. गडचिरोली यांचे मालकिचे राहते घरी अवैध्य दारूसाठा साठवून ठेवला आहे अशा खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अवैध दारु संबंधाने झडती घेतली असता, त्यांचे राहते घरी अवैध विक्री करण्याचे उद्देशाने देशी-विदेशी दारू बाळगले असल्याचे मिळुन आली.

१. किमंत:- १,०८,०००/- रुपये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपणीच्या विदेशी दारु एकुण ३६० सिलबंद निपा प्रति निप १८० मिली क्षमतेच्या

२. किंमत:- २,५०,०००/- रूपये पांढऱ्या रंगाची टाटा इंडिका

३. किंमत:- ५६,६००/- रूपये रॉयल स्टॉग विदेशी दारू ७५० एमएलच्या ४८ नग

४. किंमत:- ३,०००/- रूपये किंगफीशर बियर टिनाची बॉटल ५०० एमएल मापाच्या १५ नग

अशाप्रकारे एकुण ४,१८,६००/- रूपये किंमतीचा दारुचा मुद्देमालमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला. यातील नमुद तिनही आरोपीविरूध्द महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये पोस्टे गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास ASI/636 कुडावले हे करीत आहेत.